**पद्यपाठ ५**

**माती-मधुकर केचे**

**ठळक मुद्दे-**

या कवितेचा अभ्यास केल्यावर आपल्याला पुढील बाबी समजून घेता येतील-

१.मधुकर केचे यांचे साहित्य व मराठी साहित्यातील योगदान

२. ‘माती’ या कवितेचा आशय

३.मधुकर केचे यांच्या शैलीचे विशेष

४. ‘माती’ या विषयावर अन्य कवींच्या कल्पना

**१.प्रस्तावना**

‘माती’ या शब्दाला साहित्यात अनेक पर्यायी शब्द वापरले आहेत. जसे ‘भूमाता’ ‘जन्मदात्री’, ‘जननी’ इ. या भूमातेचे चित्रण व ऋण अनेक साहित्यिकांनी मान्य केले आहे. कवी मधुकर केचे यांनी मातीचे जे चित्रण केले आहे, त्याचे वेगळेपण समजून घ्या.

तुमच्या पाठ्यपुस्तकात दिलेली कविता येथे वाचा व ऐका.

**कविता**

**माती माती माती**
**गंध मातींतून**
**उरला व्यापून अंतराळ.**

**उंच उडे गंध**
**उंच उडे जरी**
**पतंगाची दोरी मातीपाशी.**

**म्हणोनीच जरी**
**गंध वर वर**

**मातीचा विसर पडो नेदी.**

**२.कवितेचा आशय –**

कवीने भूमीचे वर्णन करताना या मातीचा सुगंध पृथ्वीवरच नव्हे तर अवकाशातही भरून राहिला आहे. इतकेच नव्हे तर अवकाशाला व्यापूनही म्हणजे सर्वत्र असूनही तो उरला आहे असे म्हटले आहे. मातीच्या गंधाचे विशालत्व यातून दिसून येते.तसेच भूमातेचे आपल्याशी असलेले नाते सर्व जीवन व्यापून टाकणारे आहे, हे सूचित होत आहे.

पतंगाचा दाखला घेत भूमीचे वैशिष्ट्य कवी सांगून जातो.पतंग आकाशात कितीही उंच उंच उडाला तरी त्याचा दोर जमिनीवरच असतो. त्याचे मातीशी नाते उरतेच. तसेच मातीचा गंध अवकाशात जरी उंच उंच गेला, तरी त्याचे मातीशी असलेले नाते टिकून राहते. कवीला यातून सूचित करायचे आहे, की व्यक्ती कितीही कर्तृत्वाने मोठी झाली तरीही तिचे पाय जमिनीवरच असतात, भूमातेशी असलेले नाते टिकूनच असते.

म्हणून कवी म्हणतो की, मातीचा गंध जरी वरवर गेला, तरी त्याला भूमातेचा विसर पडता कामा नये. तसेच व्यक्तीचेही असावे. आपले ज्या मातीशी नाते आहे, म्हणजेच ज्या भूमीवर आपला जन्म झाला आहे , त्या मातृभूमीचा, त्या देशाचा , त्या संस्कृतीचा आपल्याला विसर पडता कामा नये.आपल्याला अजिबात विसर पडता कामा नये.

**३. कवितेची वैशिष्ट्ये-** अत्यंत कमी शब्दांत मोठा आशय व्यक्त करण्याचे सामर्थ्य म्हणजे अल्पाक्षरत्व हे वैशिष्ट्य येथे प्रकर्षाने दिसून येते.

ही कविताच रूपकात्म आहे. माती, गंध, वर वर जाणे, व्यापून उरणे, पतंगाची दोरी, इ.रूपके कवितेच्या अर्थापलीकडील मोठा आशय व्यक्त करते.

वरवर सोपी वाटणारी, निसर्ग नियम सांगणारी ही कविता माणसाने जीवन कसे जगावे ह्याचे तत्त्वज्ञान सांगते.

कवितेच्या काही ओळींमध्ये अनुप्रास आणि यमक अलंकारांचा योजिला आहे. त्यामुळे कवितेच्या सौंदर्यात भर पडली आहे.

**उजळणी प्रश्न**

अ. खालील प्रश्नांची उत्तरे ३० ते ४० शब्दांत लिहा.

१.गंध वरवर जाणे याचा अर्थ कोणता?

२.पतंगाचा दाखला कवीने का दिला आहे?

आ. खालील ओळींचे संदर्भासहित स्पष्टीकरण लिहा.

१पतंगाची दोरी मातीपाशीं

**मुक्त प्रश्न**

१.कविताचा आशय स्पष्ट होण्यासाठी कवीने पतंगाचे उदाहरण दिले आहे. हा आशय स्पष्ट करण्यासाठी अशी आणखीन कोणती उदाहरणे तुम्हाला सुचतात, ते लिहा.

२. 'माती' या शब्दाभोवती तुम्हाला अनेक विचार, कल्पना चित्रित करता येतील. १० ओळीत किंवा काव्यात त्या चित्रित करा. घरच्या नातेवाईकांना व मित्रांना त्या वाचून दाखवा.

३. **पुढील कविता वाचा. कवी कुसुमाग्रज आणि कवी मधुकर केचे यांनी माती विषयी केलेले वर्णन यातील सारखेपणा आणि वेगळेपणा शोधा.**

**खालील मुद्द्यांच्या आधारे हा विचार करता येईल-**

**आशय, कवींचा मातीकडे बघण्याचा दृष्टिकोन, रसिकाला द्यावयाची दृष्टी,शब्द्प्रयोग वर्णनशैली,**

**मातीची दर्पोक्ति -**

घनधार मृगाचा प्राशुनिया पर्जन्य
त्या तृषार्त भूवर आले नव चैतन्य,
उन्माद चढे, तो दर्प दर्वळे भोती
थरथरा कापली वर दर्भाची पाती
ते सुस्त धूलिकण गाउ लागले गीत

कोलाहल घुमला चहूकडे रानात-
अभिमानी मानव ! आम्हाला अवमानी !
बेहोष पाउले पडती अमुच्यावरुनी
त्या मत्त पदांना नच जाणीव अजूनी
की मार्ग शेवटी सर्व मातिला मिळती
मातीवर चढणे एक नवा थर अंती !
दर्पणी पाहु द्या रमणि रूप दर्पात
वा बाहू स्फुरु द्या बलशाली समरात
पांडित्य मांडु द्या शब्दांचा आकांत

ते रूप, बुद्धि ती, शक्ति, आमुची भरती,
मातीवर चढणे एक नवा थर अंती !
कित्येक शिकंदर जग जिंकुनिया गेले
कित्येक वाल्मिकी अखेर इकडे आले
कित्येक मनू अन् मुनी धुळीने गिळले
स्मृतितीलहि त्यांच्या ओळी अंधुक होती
मातीवर चढणे एक नवा थर अंती !
पाहून हासु ये तुमचे ताजमहाल

अन् गर्व किती तो ! काल काय जिंकाल ?

शेकडो ताजही जिथे शोभले काल
ती प्रचंड नगरे आज आमुच्या पोटी
मातीवर चढणे एक नवा थर अंती !
धनवंत असू द्या, असु द्या दीन भिकारी
कुणि संत असू द्या वा पापी व्यभिचारी
इकडेच वाहते सर्वांची रहदारी
हो भस्म चितेवर सारी नीति-अनीति
मातीवर चढणे एक नवा थर अंती !
मरणोत्तर वाटे होइल आशापूर्ति

स्वर्गीय मंदिरें घ्यायाला विश्रांति
लाभेल प्रभूची वा प्रमदांची प्रीति
त्या व्याकुल मतिला इथेच अंतिम शांती
मातीवर चढणे एक नवा थर अंती !
ही क्षुद्र बाहुली कोण करी निर्माण ?
बेताल नाचवी, सूत्रधार हा कोण ?
मातीतच अंती त्याचेही निर्वाण ?
स्वामित्व जगाचे अखेर अमच्या हाती
मातीवर चढणे एक नवा थर अंती !